# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 11/11/2023 (शनिवार) सकाळ

## कोढामेंढी अरोली येथील सूर नदीतून रेतीची अवैधरित्या चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर विशेष पथकाची कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक सा. यांचे विशेष पोलीस पथक नागपूर ग्रामीण यांनी दि. १०/११/२०२३ रोजी पोलीस अधीक्षक सा. यांचे आदेशाने अवैध धंद्यावर रेड करणेकामी खाजगी वाहनाने रवाना होउन पोस्टे अरोली परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त खात्रीशीर खबर मिळाली की, कोदामेंढी शिवारात असलेल्या सुर नदीच्या पात्रात ट्रॅक्टर द्वारे अवैध्यरित्या रेतीची चोरटया मार्गाने वाहतुक करीत आहेत. अशा बातमीवरून विशेष पथकाने कोदामेंढी सुर नदीवरील पुलावर वेळ ०६.०० वा. दरम्यान पोहचले असता एक लाल पांढऱ्या रंगाचा ट्रॅक्टर नदी पात्रात उभा असून काही मजूर त्या ट्रॅक्टरमध्ये घमेले पावडयाच्या साहायाने रेती भरतांना दिसुन आले. म्हणुन त्यांना रेती वाहतुकीचा परवाना विचारले असता कोणताही परवाना नसल्याचे सांगीतले. टॅक्टरची माहिती विचारली असता ट्रॅक्टर क्र. एम एच–४०/एल–३४३१ स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह ५,००,०००/–रू. व एक ब्रास रेती किं. ३०००/– रू असा एकुण ५,०३,०००/–रू. चा मुद्देमाल ट्रॅक्टरचा चालक **आरोपी नामे–गोलू उर्फ प्रविण मोरेश्वर ढोमणे, वय २७ वर्ष रा. कोदामेंढी** यांनी त्याचा मालक नामे– निळकंठ भोजराज गोमासे वय ५३ वर्ष रा. कोदामेंढी ता. मौदा जि. नागपूर यांच्या मालकीचे असल्याचे सांगितले.

सदरची रेतीची चोरटी वाहतुक मालकाच्या सांगण्यावरून ट्रॅक्टर द्वारे बिनापरवाना अवैध्यरित्या गोणखनीज रेतीची चोरी करतांना प्रत्यक्ष मिळुन आल्याने नमुद ट्रॅक्टर चालक व मालक यांच्यावर ३७९, १०९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपी व मुद्देमाल पोस्टे अरोली यांच्या ताब्यात पुढील तपास व योग्य कार्यवाहीकरीता देण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक देविदास ठमके व पोलीस नायक महेश बिसने पोलीस अंमलदार अनिल करडखेले यांनी पार पाडली.




## चोरी

पो.स्टे. केळवद:—अंतर्गत २५ कि. मी. अंतरावरील मौजा खुर्सापार येथे दिनांक ०७/११/२०२३ चे ००.०० वा. ते दिनांक ०८/११/२०२३ चे सायं. १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे—अरविंद जानराव जीगजभिये, वय ६१ वर्ष, रा. लक्ष्मीनगर नागपुर याचे शेतातील संत्राचे बगीच्या मध्ये ठेवलेले ठिंबक सिंचनाचे काळया रंगाचे प्लास्टिक नळयाचे १२० बंडल किंमती १,५०,०००/—रू चे कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मोरेश्वर चलपे, मो. नं. ९७६७५८१०४४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर